महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

# पक्षिमित्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

संपादक : दिगंबर गाडगीळ

- वर्ष – तेरावे
- अंक ४ था
- १ जुलै २०२३
- पाने –२४



मनोज बिंड

# क्षणचित्रे



नाशिक येथील पहिल्या जिल्हा पक्षीमित्र मेळाव्याप्रसंगी दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन करताना डावीकडून डॉ. अनिल माळी, दिगंबर गाडगीळ, अविनाश कुबल, मधुकर जगताप.




नाशिक येथील पहिल्या जिल्हा पक्षीमित्र मेळाव्याप्रसंगी सभेत सहभागी पक्षिमित्र




महाराष्ट्र पक्षिमीत्रच्या अकोला सभेमध्ये सहभागी पक्षिमित्र सभासद



अकोला येथील महाराष्ट्र पक्षीमित्र जिल्हासभेत मार्गदर्शन करतांना अध्यक्ष, डॉ. जयंत वडतकर




बँकाक येथे झालेल्या ८ व्या आंतरराष्ट्रीय हॉर्नबील परिषदेमध्ये सहभागी प्रा. डॉ. गजानन वाघ, प्रा. निखिल बोराडे, प्रतिक चौधरी व किरण मोरे



' ग्रेट मदर ऑफ हॉर्नबील ' नावाने ओळखल्या जाणाऱ्या डॉ. पिलई पुन्सवाड, (थायलंड) यांच्या समवेत अमरावतीचे पक्षी अभ्यासक

**संपादक**

**श्री. दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५
स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११

**सहाय्यक संपादक**

**श्री. किरण मोरे,**अमरावती, मो. ९९२३९१००३४
Email: kiranmorey1983@gmail.com

**डॉ. अनिल माळी,** नाशिक, मो. ९८५०८१८६४४
Email: anilrmali@yahoo.co.in

**कार्यकारिणी**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | **डॉ. जयंत वडतकर,** अमरावती<br>**मो. ९८२२८७५७७३** |
| कार्याध्यक्ष | - | **डॉ. राजू कसंबे,** ठाणे<br>**मो. ९००४९२४७३१** |
| संघटक | - | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे,** अहमदनगर<br>**मो. ९८५०२९१३२४** |
| कार्यवाह | - | **प्रा. डॉ. गजानन वाघ,** अमरावती<br>**मो. ९८२२२०४०७०** |
| सहकार्यवाह | - | **श्री. शरद आपटे,** सांगली<br>**मो. ९८९०३८४४००** |
| सहसंघटक | - | **डॉ. अनिल माळी,** नाशिक<br>**मो. ९८५०८१८६४४** |
| सदस्य | - | **प्रा. डॉ. निनाद शाह,** सोलापूर<br>**मो. ९४२२४५९९१५** |
| सदस्य | - | **श्री. किशोर गठडी,** औरंगाबाद<br>**मो. ९४२२२०२६२८** |
| सदस्य | - | **श्री. दिलीप विरखडे,**वर्धा<br>**मो. ७७७५८८३८६१** |
| सदस्य | - | **श्री. अविनाश कुबल,**ठाणे<br>**मो. ९३२४२३८०३१** |
| सदस्य | - | **कु. रूपाली मढवी,**मुंबई<br>**मो. ९८६९५५९९२२** |

**सल्लागार मंडळ**

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ काटदरे | (चिपळूण) | मो. ९४२३८३१७०० |
| श्री. दिगंबर गाडगीळ | (नाशिक) | मो. ९८८१०७९७११ |
| डॉ. दिलीप यार्दी | (औरंगाबाद) | मो. ९४२२७०४२२१ |
| डॉ. अनिल पिंपळापुरे | (नागपुर) | मो. ९८८१७१३४६६ |
| श्री. बापुसाहेब भोसले | (अहमदनगर) | मो.९८२२६३३१३३ |


# संपादकीय

## महाराष्ट्र पक्षी मित्रांची जिल्हा संमेलने



**दिगंबर गाडगीळ**
संपादक, महाराष्ट्र पक्षीमित्र अंक
dgadgil09@gmail.com

महाराष्ट्र पक्षीमित्र राज्यभर विखुरलेले आहेत. काही जिल्ह्यांत त्यांची संख्या बऱ्यापैकी आहे. काही जिल्हे अजून कोरे आहेत. अशा जिल्ह्यातून सभासद व्हावेत यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी प्रामुख्याने संघटकांची आहे. त्याला मदत जवळपासच्या जिल्ह्यातील कृतिशील सभासदांची मिळू शकते.

जिल्ह्यात सभासद वाढवावेत, आहेत त्या सभासदांनी जिल्ह्यात कार्यक्रम राबवावेत, संघटित प्रयत्नांचा दबाव वन खात्यावर आणण्यासाठी प्रयत्न करावेत. थोडक्यात काय करता येईल यासाठी विचारविनिमय करण्यासाठी जिल्हावार सभासदांचे मेळावे घ्यावेत, असा एक विचार होता. सभासदांच्या जिल्हावार याद्या तयार करण्याचे काम ठाण्याचे श्री. अविनाश कुबल यांनी केल्यावर नाशिक जिल्ह्यात असा पहिला मेळावा २७ मे रोजी घेण्यात आला. त्याचा वृत्तांत या अंकात आहे.

इतर जिल्ह्यात असे मेळावे लवकरच घेतले जातील. राज्यव्यापी संघटनेचे काम सर्वत्र पसरण्यास अशा मेळाव्यांची मदत होईल.

राज्य संघटनेची दखल आता महाराष्ट्र सरकारकडून घेतली जाऊ लागली आहे. हे नोव्हेंबरमधील पक्षी सप्ताहातून समोर आले आहे. थोडक्यात पक्षी विषयक कार्यक्रम राज्यभर राबविण्यात संघटनेची मदत घेतली पाहिजे, हे सरकार दरबारी जाणवू लागते आहे. त्यातून केवळ महाराष्ट्रात होणाऱ्या पक्षी संमेलनासाठी अनुदान, संमेलनात होणाऱ्या ठरावांच्या अमलबजावणीसाठी मदत आदी मागण्या सरकारकडे करता येतील. साहित्य संमेलनासाठी सरकारने यंदाच्या संमेलनापासून अनुदान दुप्पट केले आहे. तसे अनुदान पक्षी संमेलनासाठी द्यावे, ही मागणी पुढे रेटता येईल.

जिल्हावार संमेलनातून मूलभूत निसर्गरक्षणासाठी काम वाढविता येईल. या दृष्टीने प्रयत्न व्हावेत, ही विनंती करतो.

*****

मुखपृष्ठ छायाचित्र - ऑरेंज हेडेड थ्रश    छायाचित्रकार - मनोज बिंड, अमरावती

# ✻ अध्यक्षीय ✻



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

या वर्षीचा उन्हाळा पावसाळ्याप्रमाणे वागला त्यामुळे सुरुवातीच्या काळात तो फार जाणवला नाही, मात्र शेवटी शेवटी त्याची दाहकता सर्वांनी अनुभवली. पावसाचे आगमन उशिराने झाल्यामुळे शेवटचे काही दिवस सर्वांची परीक्षा पाहणारे होते. उन्हाच्या तडाख्यात दरवर्षी पाणवठे, लहानमोठे तलाव-धरण, नदी-नाले आटतात, त्यामुळे माणसासोबत सर्वच प्राण्यांचे व पक्ष्यांचेही या काळात हाल होतात या वर्षी पाऊस उशिराने येणार असल्याने ही दुष्काळी परिस्थिती जरा जास्त काळ लांबणार आहे. उशिराच्या पावसामुळे पावसाळ्याच्या आगमनाच्या मुहूर्तावर विणीच्या हंगामासाठी येणारे अनेक पक्षी उशिराने येत असल्याचे दिसून आले असून, या काळात घरटी करणाऱ्या स्थानिक पक्ष्यांनीसुद्धा पाळणा लांबविण्याचा निर्णय घेतलेला दिसून येत आहे.

या काळात तलाव आणि धरणे आटली असल्याने उन्हाळ्यात अनेक ठिकाणी यातील गाळ काढण्याची कामे होत आहेत. तलाव आणि धरणे वर्षानुवर्षे गाळाने भरत जातात त्यामुळे पाणी साठा कमी झाला आहे. त्यामुळे त्यातील गाळ काढणे नक्कीच आवश्यक आहे. हा सुपीक गाळ शेतीसाठीसुद्धा उपयुक्त आहे. मात्र या प्रक्रियेत या तलावात वर्षानुवर्षापासून तयार झालेल्या परिसंस्थेची व त्यातील जैवविविधतेची वाट लागते. पक्ष्यांचे व स्थानिक माशांचे अधिवास क्षणात नष्ट होतात. त्यामुळे गेल्या ५-६ वर्षांपूर्वी जेव्हा भंडारा जिल्ह्यातील तलावांवर गाळ काढण्याचे काम सुरू झाले होते त्यावेळी वन विभागाचे तत्कालीन मुख्य सचिव श्री. प्रवीणसिंह परदेशी सरांनी याकडे लक्ष दिले. यासाठी या क्षेत्रातील तज्ञांचा सल्ला घेऊन एक कार्यप्रणाली ठरविण्यात आली होती. त्यावर आपल्या पक्षीमित्रचे ज्येष्ठ सभासद भंडारा येथील श्री. राजकमल जोब व श्री. मनीष राजनकर यांनी यासाठी अनेक जनजागृती कार्यक्रम घेतले. गाळ काढणाऱ्या यंत्रणेला सल्लागार या नात्याने कशा प्रकारे गाळ काढला जावा याचे प्रशिक्षण दिले. एकाच वर्षी पूर्ण तलावातील गाळ न काढता तो टप्प्याटप्प्याने काढण्यात यावा व यंत्रांचा कमीत कमी वापर व्हावा अशी कार्यप्रणाली वापरण्यात आली होती. जेणेकरून संपूर्ण जैवविविधता धोक्यात येणार नाही. यावर्षी अकोला येथेसुद्धा गाळ काढण्याचे काम सुरू झाले त्यावेळी आपले विदर्भ (अमरावती विभाग) समन्वयक श्री. अमोल सावंत व अकोला जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. मिलिंद शिरभाते यांनी महाराष्ट्र पक्षीमित्र व निसर्ग कट्टा यांचे तर्फे मृद व जलसंधारण विभाग अकोला यांना निवेदन देऊन तलावातील गाळ काढताना तेथील जैवविविधता नष्ट होणार नाही आणि या गाळातून पक्ष्यांसाठी बेट तयार करण्याची मागणी केली. त्यावर मृद व जलसंधारण विभागाचे अधिकारी श्री. हरिभाऊ गिते यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन तशा सूचना सबंधित यंत्रणेला दिल्या. त्यानंतर गिते साहेब आपल्या महाराष्ट्र पक्षीमित्रचे आजीवन सभासदसुद्धा झालेत हे विशेष. स्थानिक स्तरावर केल्या केलेल्या अशा छोट्या छोट्या कृती पक्षी संवर्धनासाठी उपयुक्त ठरतात याचे हे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल.

चंद्रपूर येथील संमेलनात ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र पक्षीमित्रच्या सर्व सभासदांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने व सभासदांनासुद्धा चर्चेमध्ये सामावून घेण्याच्या दृष्टीने जिल्हावार व्हाट्स ॲप गट तयार करण्यात आले असून त्यामध्ये त्या-त्या जिल्ह्यातील सर्व सभासदांना तसेच सबंधित जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक यांना त्यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. या ग्रुपचा पहिला फायदा असा झाला की, त्या-त्या जिल्ह्यातील आपल्या सभासदांची एकमेकांसोबत ओळख होत असून त्यातून चर्चासुद्धा घडत आहेत. महाराष्ट्र पक्षीमित्रच्या सभासदांनी आपापल्या जिल्ह्यात एक जिल्हास्तरीय सहविचार सभा किंवा एक दिवसीय संमेलन घेण्यात यावे, असे आवाहन महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद मिळत असून राज्यात सर्वप्रथम नाशिक जिल्ह्याने असे संमेलन घडवून आणले. नाशिक येथे दि. २७ मे रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमात जवळपास ४० सभासदांनी आपली उपस्थिती दर्शविली. यावेळी दिवसभरात जवळपास १० वक्त्यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमासाठी आपले नाशिक जिल्हा

समन्वयक सिए श्री. मधुकर जगताप, म.प.चे सहसंघटक डॉ. अनिल माळी यांनी पुढाकार घेतला. कार्यकारिणी सदस्य अविनाश कुबल हे म.प.तर्फे प्रतिनिधी म्हणून या कार्यक्रमास उपस्थित होते. या वेळी अनेक नवीन सभासदसुद्धा संस्थेसोबत जुळले.

जिल्हास्तरावरील दुसरी सहविचार सभा अकोला येथे दि. १८ जून रोजी पार पडली. आपले अमरावती विभाग समन्वयक श्री. अमोल सावंत आणि अकोला जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. मिलिंद शिरभाते यांनी सदर आयोजनासाठी पुढाकार घेतला. या सभेसाठी महाराष्ट्र पक्षीमित्र प्रतिनिधी म्हणून अध्यक्ष या नात्याने मी स्वतः हजार होतो. या कार्यक्रमासाठी जवळपास २० सभासद उपस्थित होते. येत्या काळातसुद्धा अनेक ठिकाणी जिल्ह्यास्तरीय सभा होणार असून त्यासाठी अनेक ठिकाणी चर्चा व नियोजन सुरू आहे. या संदर्भात माझे अनेकांशी बोलणे होत आहे. अशा सभांच्या माध्यमातून म.प.चे जाळे आणखी मजबूत होऊन पक्षी संवर्धनासाठी त्याचा भविष्यात निश्चित उपयोग होणार आहे हे निश्चित

महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे यापूर्वी पक्षी विषयक व्याख्यानांचे वेबिनारच्या माध्यमातून आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पहिल्या दोन मालिकेतून सुमारे ४० व्याख्याने ऑनलाईन पद्धतीने पार पडली. यातून अनेक विषय आपले सभासद व पक्षीमित्र यांचेपर्यंत पोहोचले होते. त्यावेळी अनेक नवीन सभासद संस्थेसोबत जुळले. आता अनेक सभासदांच्या आग्रहावरून ही व्याख्यानमालिका पुन्हा सुरू करण्यात आली असून या अंतर्गत प्रत्येक महिन्यातील दुसऱ्या व चौथ्या बुधवारी सायंकाळी एक व्याख्यान आयोजित केले जाणार आहे. यासाठी आपले सभासद श्री. किरण मोरे व प्रा. डॉ. चेतना उगले सदर आयोजनासाठी सहकार्य करणार आहेत.

यावर्षीचे ३६ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन सांगली येथील बर्ड साँग या संस्थेच्या यजमानपदाखाली आयोजित होणार असून आयोजकांकडून नुकत्याच संमेलनाच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सदर संमेलन येत्या डिसेंबर महिन्यात ख्रिसमस सुट्टीला लागून शनिवार व रविवार दि. २३– २४ डिसेंबर या तारखेला होणार आहे. संमेलनास धरून आधीच्या दिवशी एका कार्यशाळेचेसुद्धा आयोजन केले जाणार आहे. या संमेलनाची प्राथमिक कार्यक्रमपत्रिका व नोंदणीची प्रक्रिया लवकरच आयोजकांकडून जाहीर केली जाईल. या संमेलनासत्सुद्धा पक्षिमित्रांचा उत्स्फूर्त सहभाग लाभेल यात शंकाच नाही.

*****



अकोला जिल्हा महाराष्ट्र पक्षिमित्र मेळाव्यामध्ये सहभागी सदस्यांना 'पक्षिमित्र' अंक वितरीत करून नविन सभासदांचे स्वागत करण्यात आले.

# क्रॅब प्लोवर आणि तिसरे पक्षिमित्र संमेलन, पन्हाळा



**शरद आपटे**
पक्षितज्ज्ञ, सांगली
9890384400

नुकताच मी डॉ. एरिक भरुचा यांची मुलाखत घेण्यासाठी पुणे इथे त्यांच्या घरी गेलो होतो. उद्देश माझ्या आगामी पुस्तकात त्यांच्या ध्वनिमुद्रण कामाबाबत लिहावे.

अतिशय साचेबद्ध पारशी पद्धतीच्या त्यांच्या घरात माझे स्वागतही तसेच झाले. मी नाव वाचून चुकून आणखी एका भरुचांच्या घराची बेल दाबली आणि अतिशय नाराजीच्या आठ्या कपाळावर घेऊन एका बाईंनी दार उघडले. माझे अनाहूतपणे येणे त्यांना मान्य नसावे. खुणेनीच त्यांनी वरचा मजला सांगितले आणि धाडकन दार लावून घेतले. आता मात्र दोन वेळा नाव वाचून मी बेल दाबली. दरवाजाची चौकट सरळ भिंतींना समान्तर नेहमी असते तशी नव्हती. ती थोडी कोनात होती. पुन्हा एका निर्विकार वयस्क बाईने दार उघडले आणि मी नाव सांगतच डॉक्टरना तुमच्याकडे कोणी आले आहे, असे खुणेनेच सांगितले. डॉक्टर आले मी ओळख सांगताच त्यांनी थेट वरच्या मजल्यावरील त्यांच्या अभ्यासिकेत मला नेले. खोली मोठी प्रशस्त. पुस्तकांनी भरलेली कपाटे, शोध निबंधांचे, जर्नलचे गठ्ठे, असा एकूण बाज त्या खोलीचा होता. डॉक्टरांनी टेरेसवर खुर्च्या मांडल्या. मला त्यांच्या मुलाखतीचे ध्वनिमुद्रण करायचे होते म्हणून आम्ही पुन्हा खोलीत येऊन बसलो.

डॉ. सालीम आली यांच्यानंतर निसर्ग अभ्यासात आदरपूर्वक ज्या व्यक्तीचे नाव घेता येईल अशी व्यक्ती म्हणजे डॉ. भरुचा. पक्षी निरीक्षक, लेखक खूप आहेत पण त्यांच्या संवर्धनसाठी नेमके काय केले पाहिजे हे करून दाखविणारे हे एकमेव आहेत असे माझे मत आहे. त्यांनी असे अनेक संवर्धन प्रकल्प यशस्वी राबिविले आहेत. आज ते याच विषयात भारती विद्यापीठात अध्यापन करतात. या विषयातील अनेक अभ्यासक्रम त्यांनी आखले आहेत आणि त्यांची क्रमिक पुस्तके लिहिली आहेत. सुमारे २५ ग्रंथ आज त्यांच्या नावावर आहेत. निसर्ग संवर्धन वैदिक काळ ते आज अशा महत्त्वपूर्ण ग्रंथावर ते सध्या काम करीत आहेत त्यांचे वय ८१ आहे म्हणजे (१८) एकावर आठ.

पक्षिमित्र संघटना आणि सम्मेलन हा विषय जेव्हा येतो तेव्हा डॉ. एरिक भरुचांचे नाव कधी घेतले गेल्याचे ऐकिवात नाही.

डॉ. भरुचा पुण्याचे रहिवासी. त्यांचे शिक्षण आणि पुढे सर्जन म्हणून व्यवसाय पुण्यातच सुरु झाला. ते शालेय वयापासून पक्षी निरीक्षण करीत असत. मेडिकल कॉलेजला असताना त्यांची आणि पक्षिमित्र संस्थेच्या संस्थापक सभासदांपैकी एक कै. डॉ. रमेश बिडवे यांच्याशी त्याचा संबंध आला. डॉ. भरुच्यांकडे दुर्बीण आणि पुस्तके होती. पुस्तकांची विशेष देवाण घेवाण होऊन त्यांचे काम सुरु झाले. डॉ. भरुचांकडे कॅमेरा असल्याने पक्ष्यांच्या स्लाईड्स होत्या; पण त्याचा शो करून मुलांना शिकवावे, असा जनसंपर्क नव्हता. तो डॉ. रमेश बिडवेनी पुरविला आणि दोघे मिळून काम करू लागले इथे डॉ. भरुचांचा पक्षीमित्रशी संबंध आला. डॉ. भरुचा आजही कबुल करतात की, माझ्या कामाची पहिली प्रसिद्धी रमेशमुळे मला मिळाली. रमेश हे अतिशय निरलस आणि तळमळीचे कार्यकर्ते होते, त्यांचे स्मरण पक्षीमित्र संघटनेने ठेवले पाहिजे.

१९८३ साली पन्हाळा इथे तिसरे सम्मेलन भरले आणि डॉ. भरुचा त्यात सामील झाले. मंडळी कोल्हापुरात जमली. प्रस्थान करण्यापूर्वी रंकाळा तलाव पक्षिनिरीक्षण बेत ठरला. सर्वजण तलावावर पोहचले. नेहमीचे पक्षी पाहताना तलावाच्या एका कोपऱ्यात उडणाऱ्या पक्ष्यांच्या थव्याने त्यांचे लक्ष वेधले. उडण्यावरून हे पक्षी वेगळे आहेत असे त्यांना वाटले म्हणून आणखी पुढे जाऊन ते पाहावेत आणि जमल्यास त्यांचा फोटो घ्यावा अशी त्यांची इच्छा होती. मात्र ते वेगळे नसून शेकाटे आहेत असे दुसरे मत पडले म्हणून नाद सोडून मंडळी संमेलनास गेली. डॉ. भरुचांच्या मनात मात्र तो विषय तसाच घोळत राहिला आणि सम्मेलन संपताच ते सरळ रंकाळ्यावर गेले आणि पुन्हा तो थवा तिथेच पाहिला. त्यांचे फोटो घेतले, मात्र अजून पक्षी ओळखला नव्हता. पुढे तो ओळखला. मात्र खात्री देता येत नव्हती. कारण पुस्तकात त्यांचा आढळ फक्त समुद्र किनारे आणि तेही मुंबईपर्यंतच

दाखविला होता.

आता पुढे काय? म्हणून त्यांनी डॉ. सालीम अलींना पत्र लिहिले आणि भेट मागितली. एका रविवारी ते त्यांच्या घरी दाखल झाले. आपल्या स्लाईड्स त्यांनी त्यांच्या पुढ्यात ठेवल्या आणि डॉक्टर काय म्हणतात ते वाट पाहू लागले. डॉक्टरानी स्लाईड व्ह्यूवर काढला आणि एक एक स्लाईड तपासली आणि विचारले, 'तुला कोणता पक्षी वाटतो?'


भरुचा भीत भीतच उत्तरले, 'क्रॅब प्लोवर!'

'अरे बरोबरच आहे, मग तुला शंका का आली आणि इतका दूर का आलास?'

पुन्हा डॉक्टर भीत भीतच, 'सर फोटो कोल्हापुरातील रंकाळा तलावावरील आहे आणि तुमचे पुस्तक त्याचा आढळ समुद्र किनारा असे सांगते.'

डॉ. सलीम अलींनी एक कागद आणि पेन समोर ठेवले आणि आज्ञा केली, जर्नलसाठी इथेच बसून शॉर्ट नोट लिही, तोवर नाश्ता तयार होतोय.

आज ते रेकोर्ड आहे. ते पुढे कोणी तपासले आहे का? पुढे ते पक्षी पुन्हा दिसलेत का? माहीत नाही.



**डॉ. एरिक भरूचा, पुणे**



**Crab Prover**

*****

# असे पाहुणे येती
# महाराष्ट्रात प्रथमच व्हिंचॅट पक्ष्याची सोलापूर परिसरात नोंद


**निनाद शहा**
पक्षितज्ञ, सोलापूर, 9422459915

**ओंकारनाथ गाये**
9823354154.


महाराष्ट्र आणि सोलापूर जिल्ह्याच्या पक्षी वैभवात आणखी एका परदेशी पक्ष्याची भर पडली आहे. सोलापुरातील आमचे पक्षी निरीक्षक श्री. ओंकारनाथ गाये जे नियमितपणे पक्षी निरीक्षण करतात, त्यांना बोरामणीजवळ, १८ डिसेंबर २०२२ रोजी पाहिलेल्या एका पक्ष्याची ओळख लागेना म्हणून त्यांनी प्रा.डॉ. निनाद शहांना या पक्ष्याचा फोटो दाखवला. तो फोटो पाहून श्री गायेंचे अभिनंदन करून सांगितले की, आपण एक दुर्मीळ व केवळ आपल्या परिसरातच नव्हे तर महाराष्ट्रात प्रथम आलेल्या पक्ष्याला पाहिलेले आहे. त्याला इंग्रजीत व्हिंचॅट (Whinchat) असे म्हणतात. शहा सरांनी त्यांचे मराठीत नामकरण मोठ्या भुवईचा गप्पीदास असे केलेले आहे. हा स्थलांतर (Migration) करणारा पक्षी खरंतर भारतात येत नाही. व्हिंचॅट गप्पीदास मूळचा युरोप व पश्चिम आशियातील पक्षी आहे. त्याचे नियमित स्थलांतर (Migration) मध्य व दक्षिण आफ्रिकेत होत असते. परंतु पक्षी जगतात काही पक्षी त्यांचे स्थलांतराचे नेहमीचे मार्ग व देश सोडून कधीकधी इतर देशात काही कारणाने जातात, त्यांना भरकटलेले **(Vagrant)** पक्षी म्हणतात. भारतात व्हिंचॅट यापूर्वी असाच भरकटत फक्त दोनदा येऊन गेल्याची नोंद आढळते- एक चंबळ नदीकाठी असलेल्या राष्ट्रीय चंबळ अभयारण्य, उत्तर प्रदेश (Saleem et al , 2019) व दुसरी नोंद (R. Magesh et al, २०२२) धारापूरम, जिल्हा तिरुप्पूर, तामिळनाडू, येथे. याचा अर्थ महाराष्ट्रात याची प्रथमच नोंद आपल्या सोलापूर जिल्ह्यातील बोरामणी मध्ये झालेली आहे.म्हणजे भारतातील केवळ तिसरी व महाराष्ट्रातील ही पहिली नोंद आहे. हे व्हिंचॅट प्रथम ओंकारनाथ गायेंना डिसेंबर २०२२ मध्ये बोरामणीजवळ दिसले. अधून-मधून दर्शनानंतर शेवटचे दर्शन १२ फेब्रुवारी २०२३ रोजी आम्ही विहंग मंडळाचे सदस्य एकरुक (हिप्परगा) तलावावर पक्षी निरीक्षण करताना त्यांची जोडी आम्हाला आढळली.

ग्रिमेट आणि सहकारी (२०११) तसेच इतरही इंडियन सबकाँटिनेंटल बर्ड फिल्ड गाईडसमध्ये व्हिंचॅटचा उल्लेख नाही. पण आपल्या शेजारी श्रीलंकेत व्हिंचॅटची नोंद झाली आहे (Steiof et al., 2017).

व्हिंचॅट हा मोठ्या भुवईचा गप्पीदास खुल्या गवताळ माळरानावर विखुरलेल्या छोट्या झुडपांच्या प्रदेशात आढळतो. युरोपमध्ये पक्ष्याच्या या अधिवासात सुगंधी पिवळी फुले असलेली व्हिन (Whin) ही तण असणारी, काटेरी झुडुपे असल्याने त्याला व्हिंचॅट नाव दिलेले आहे. त्याचे शास्त्रीय नाव Saxicola rubetra असे आहे. या छोट्या पक्ष्याची लांबी १२ सेंमी,पंख विस्तार २२ सेंमी वजन १७ ग्रॅम असते. याचे आयुष्यमान केवळ दोन वर्षे कधीकधी पाच वर्षांपर्यंत असते. नर पक्ष्याचे डोके गडद, भुवई मोठी व पांढरी, पाठ काळसर तपकिरी तर गळा व छाती पिवळसर तपकिरी नारिंगी असते.मादी सर्वसाधारण फिकट तपकिरी रंगाची असते. भुवई फिकट बफ रंगाची असते. विशेष म्हणजे सोलापूर येथे नर मादी दोन्ही आढळले, पण चंबळ आणि धर्मापुरम येथे मात्र एकल पक्षी दिसले.

व्हिंचॅटसारखे दूरवर स्थलांतर करण्याची क्षमता असलेले पक्षी असे नेहमीच्या स्थलांतरणमार्गापासून प्रसंगी इतरत्र आढळून येतात.

व्हिंचॅट व सामान्य गप्पीदास (Common stonechat) किंवा सैबेरियन गप्पीदास (Siberian stonechat) सारखे दिसत असले तरी व्हिंचॅटच्या ठळक, मोठ्या व रूंद पांढऱ्या भुवईमुळे तो सहजच ओळखता येतो. व्हिंचॅटच्या पंखावर लहान पांढरी पट्टी असते. चोच, पाय, शेपूट काळ्या रंगाचे असतात. मादी नरासारखीच दिसते फक्त भुवई मात्र फिकट असते.

व्हिंचॅट झुडपांच्या शेंड्यावर, कुंपणावर अशा थोड्या उंच ठिकाणी बसून भक्ष्याचा /कीटकांचा शोध घेत असतो. त्यावेळी त्याची शेपटी सतत वर खाली होत असते. कीटकांसह इतर लहान

अपृष्ठवंशी प्राणी त्याचे खाद्य होय. व्हिंचॅट जवळजवळ बारा विविध पक्ष्यांच्या आवाजाच्या नकला (मिमिक्री) करतो. युरोपमध्ये विणीच्या हंगामात याच्या घरट्यात कोकिळा (Cuculus canorus) अंडी घालत असते.

सोलापूर जिल्हा आणि महाराष्ट्र पक्ष्यांच्या विविधतेत श्रीमंत आहेत. माझ्या अंदाजानुसार सर्व मित्रांनी फोटोग्राफी मर्यादित ठेवून पक्षी निरीक्षणाकडे बारकाईने लक्ष दिले तर जिल्ह्यातील अधिवासांची विविधता व पोषकता पाहून आता असलेली सोलापूर जिल्ह्याची ३७५ पक्ष्यांची नोंद सुमारे ४०० पर्यंत पोहोचू शकेल, आणि महाराष्ट्र पक्षी सूचीमध्येही भर पडेल असे वाटते.



निनाद शहा



ओंकारनाथ गाये

संदर्भ :


(1) Grimmett R., Inskipp C. and Inskipp T.(2011) Birds of the Indian Subcontinent, Oxford University Press, London.

(2) R. Magesh, D. Sadashivan, G. Ranganathan, S. Sivakumar and N. Yoganathan(2022), Indian Birds, vol 18, No. 1

(3) Saleem R.M., Azeez P.A. Ravi Rishi and Thillai Makadhan(2019), Researchgate. net /published21 / 06/ 2019 DOI:10.13140 / RG 2.2.31898.70082

(4) Steiof, K. , De Silva, C., Jayratha, J., Madlow, W ., Pohl, M., Puschel, W. and Zerning, M. (2017)Indian Birds vol13, No. 4. pp 108-111.






*****

## पुस्तक परिचय

सातारा येथील आपले सभासद डॉ. उमेश करंबेळकर यांनी साहित्याच्या नव्या क्षेत्रात प्रवेश केला आहे. ते क्षेत्र आहे मुलांसाठी रंगीत पुस्तकांचे. मराठीत मुलांसाठी सचित्र रंगीत पुस्तकांची वानवाच असते. यापूर्वी डॉ. करंबेळकर यांना त्यांच्या प्रौढांसाठीच्या पुस्तकासाठी पुरस्कार मिळाला आहे.

पुस्तकांच्या शेवटी जागरुक निसर्गप्रेमी या नात्याने संदेश दिलेला आहे.

१) **परक्या फुलांची गोष्ट**
चित्रे : मैत्रेया नामजोशी

२) **उडणाऱ्यांचा तलाव** – चित्रे : संतोष धोंगडे
प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे, ३०
किंमत : अनुक्रमे १०० आणि ८०/– रुपये

*****

## शुकवन : जगातील सर्वांत मोठा पक्षी विहार

२०१२ साली डॉ. श्री. गणपती सच्चीदानंद स्वामीजी यांनी हा पक्षी विहार सुरू केला. मे २०१७ मध्ये त्यासाठीची इमारत उभी राहिली. तिथे ४६८ जातीचे पक्षी राहतात. हा जागतिक विक्रम आह, असे गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने मान्य केले आहे. नावाप्रमाणे त्यात पोपटाच्या सर्वाधिक जाती आहेत. शुकवनात सुमारे दोन हजार पक्षी आहेत. पक्षी विहाराला जोडून जखमी, आजारी पक्ष्यांसाठी दवाखाना आहे.

# शृंगी घुबडाला (Rock Eagle Owl) सुखरूप नैसर्गिक अधिवासात सोडले.

**हेमराज पाटील**
9922085434
sunrisehemraj@gmail.com

**चोपडा :** दिनांक ११ मे गुरुवारी रात्री साडेदहाला एक मोठे घुबड रस्त्याच्या कडेला बसलेले आहे, ते उडू शकत नाही, असा रेस्क्यू कॉल मला दिनेश बोरसे यांच्याकडून आला. थोडाही विलंब न करता त्या ठिकाणी जाऊन ट्रान्सपोर्ट पिंजऱ्यात मी घुबड घरी आणले. प्राथमिक तपासणी केली. घुबडाला कोठेही जखम नव्हती, परंतु घुबड आजारी व अशक्त होते. अनेक दिवसांपासून त्यास शिकार मिळालेली नव्हती, उन्हाच्या तडाख्याने ते त्रस्त होते. त्यानंतर पुढील तीन दिवस घरीच वेळोवेळी योग्य औषधोपचार, आवश्यक मांसाहार देण्यात आला. दुसऱ्या दिवशी घुबडाच्या तब्येतीत सकारात्मक बदल जाणवला. घुबडाची स्वच्छतेची विशेष काळजी घेण्यात आली, ट्रिटमेंट पिंजऱ्यात मातीचे मोठे जलपात्र भरून ठेवले होते, त्यात घुबड दिवसातून चार ते पाच तास पाण्यात उभे राहून शरीरातील उष्णतामान कमी करण्याचा प्रयत्न करायचे. त्यानंतर दोन दिवसात घुबड चपळाईने हालचाल व पंखांची फडफड करू लागले. घुबडाच्या मुक्त हालचालींसाठी त्यास खास मोठ्या पिंजऱ्यात (4.l x 4.b x 4.w) ठेवण्यात आले. ते अधून-मधून मोठा आवाजदेखील करू लागले. तीन दिवसानंतर ते नैसर्गिक अधिवासात उडण्यास सज्ज झाले. अशा महत्त्वाच्या घुबड पक्षी प्रजातीला वाचवण्यात यश आले, त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात रविवारी उशिरा रात्री सुखरूप सोडण्यात आले. सुश्रुषा व उपचार कामी सौ. अश्विनी पाटील व आर्यदीप पाटील यांचे अनमोल योगदान लाभले. तसेच ट्रान्सपोर्टकामी श्री. नितीन शिंपी यांचे सहकार्य लाभले. अनेक पक्षी व घुबड दुर्मीळ होत चालले आहेत. दुर्मीळ होत असलेल्या घुबड प्रजातींपैकी ही एक प्रजाती म्हणजे भारतीय शृंगी घुबड. नैसर्गिक अधिवासाचा ऱ्हास, अंधश्रद्धेपोटी होणारी यांची शिकार, घुबड अपशकुनी आहे, असा खोटा समज आदी कारणांमुळे यांची संख्या खूपच कमी झाली आहे. शृंगी घुबड वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या कायद्यानुसार अनुसूची २ मधील पक्षी असून त्याची शिकार करणे, त्याच्या अवयवांचा व्यापार वा तस्करी करणे, बाळगणे हा कायद्याने गुन्हा आहे. त्यासाठी आर्थिक दंडासह चार वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा आहे.

घुबड हे निसर्गातील अन्नसाखळीतील महत्त्वाचा घटक असून शेतकऱ्यांचे व मानवाचे मित्रच आहेत. एक घुबड वर्षाला साधारणता साडेतीनशे ते चारशे उंदीर मारते. शेतातील पीक व अन्नधान्याचे नुकसान करणाऱ्या उंदरांच्या संख्येवर नियंत्रण ठेवते. त्याचबरोबर इतर लहान सजीव यांचे देखील भक्षण करून निसर्ग साखळीतील संतुलन टिकविण्यास मदत करते. म्हणून त्यांचे संवर्धन करणे अनिवार्य आहे. पक्षी व वन्यजीव बचाव कार्यात सतत मदत करत असल्याने वन विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सातपुडा निसर्ग संवर्धन संस्थेचे अभिनंदन केले.



**दुर्मिळ शृंगी घुबडाला वाचवण्यात सातपुडा निसर्ग संवर्धन संस्थेला यश पक्षी मित्र दांपत्याचे बर्ड रेस्क्यू व संवर्धनासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न**

ता.क. - रविवारी उशिरा रात्री घुबड नैसर्गिक अधिवास सातपुड्यात सोडून आल्यानंतर घरी आल्यावर मुलगी कु. कृष्णप्रिया हिने घुबड का सोडून आलेत, त्याचा आपल्याला काही त्रास नव्हता, ते नेहमी आपल्या सोबत राहू शकले असते, ते बिचारे आजारी होते, त्याला कोणीच नाही, मग का म्हणून तुम्ही त्याला सोडून आले... असा सारखा तगादा लावला व हमसून रडू लागली, तिला समजावता, समजावता मला देखील अश्रू अनावर झाले. अनेकदा पक्षी घरी रेस्क्यूसाठी येतात, परंतु जे पक्षी जास्त दिवस घरी राहिले, ज्यांना मुलांनी देखील हाताळले, त्या विशिष्ट पक्ष्यांबद्दल त्यांना खूप लळा लागलेला दिसला. अनेकदा ते खूप भावनिक होतात, रडतात देखील. आम्हा दोघांना त्यांना समजावावे लागते. असो. यातून आमच्या दोघा बालकांमध्ये पक्षी, वन्यजीव व निसर्ग घटकांबद्दल संवेदनशीलता, भावनिकता, त्यांचे रक्षण करणे हे गुण रुजत आहेत, याचे आम्हाला खूप समाधान वाटते.

चोपडा व यावल वन विभागासाठी पक्षी व वन्यजीव बचाव कार्यासाठी मोफत सेवा सहायता संपर्क क्रमांक : ९९२२०८५४३४.

*****

## स्वागत नविन सभासदांचे

### (दिनांक ०१ एप्रिल २०२३ ते ३० जुन २०२३)

| Membership No. | Name of Member | Place/ District |
|---|---|---|
| 1464 | Sau. Sulbha Milind Sawale | Nashik |
| 1465 | Dr. Swati Deepak Damodare | Akola |
| 1466 | Mr. Milind Mohan Sawale | Nashik |
| 1467 | Mr. Uday Shashikant Agashe | Thane |
| 1468 | Mr. Dhananjay Dinkar Divekar | Mulund |
| 1469 | Dr. Anand Manohar Railkar | Pune |
| 1470 | Mr. Darshan Prashant Dudhane | Wardha |
| 1471 | Ku. Aarti Imandar Fule | Gondia |
| 1472 | Dr. Rakhi B. Shambharkar | Gadchiroli |
| 1473 | Mrs. Smita Mahendra Bhamare | Nashik |
| 1474 | Ku. Pratiksha S. Kothule | Nashik |
| 1475 | Mrs. Jayashree P. Bapat | Nashik |
| 1476 | Mrs. Seema Tangadpalliwar | Nashik |
| 1477 | Mrs. Vinita Vijay Kulkarni | Nashik |
| 1478 | Mr. Ramakant R. Kulkarni | Nashik |
| 1479 | Mrs. Noorjehan Merchant | Nashik |
| 1480 | Mr. Dhiraj M. Watekar | Chiplun |
| 1481 | Mr. Haribhau K. Gite | Nashik |
| 1482 | Mr. Kiran Ravindra Shelar | Mumbai |
| 1483 | Mr. Umang kale | Thane |
| 1484 | Ku. Samruddhi V. Dhamale | Pune |
| 1485 | Mr. Hrishikesh Anil Wagh | Pune |
| 1486 | Mrs. Archana Sanjay Muley | Akola |
| 1487 | Mr. Prathmesh Umesh Mone | Pune |

# निवळीचे तळे



**माणिक पुरी**
निसर्ग लेखक,परभणी
9881967346

(१)

खूप दिवसांपासून निवळीचे तळे पाहण्याची इच्छा होती. पण कामाच्या व्यापामुळे शक्य व्हायचं नाही. पावसाळ्यापासून अनेक बेत आखले. परंतु ते बेत मनातच राहिले. त्यासाठी फेब्रुवारी महिना उजाडला. थंडी चांगलीच वाढलेली. अशा गारव्यात तळ्याच्या काठा-काठानं मनसोक्त भटकायचं असं ठरवूनच घरातून बाहेर पडलो.

पहाटेची वेळ. थंडीनं अंगात हुडहुडी भरलेली. पाठीवर बॅग, गळ्यात दुर्बिण, हातात नोंदवही आणि 'भारतातील पक्षी' पुस्तक घेऊन करपरा नदीच्या पात्राजवळ पोहोचलो; पण जिथं नदीच्या प्रवाहाला थोपविलेलं तिथपासून तळ्याचा विस्तार मोठा होत गेलेला दृष्टीस पडला. पक्षिमित्र अनिल उरटवाड हा सोबती होता. आम्ही दोघांनी अनेक पाणपक्ष्यांच्या नोंदी घेतलेल्या होत्या. या तळ्यातील आणि लगतच्या परिसरातील पाणपक्ष्यांचा अधिवास समजून घेण्यासाठी आम्ही पक्ष्यांच्या दिशेनं निघालो.

काठालगत उगवलेल्या गवतात 'तुतवार' पक्षी काहीतरी टिपताना दिसला. दलदलही नव्हती आणि कोरडी जमीनही नव्हती. तिथं बोटभर उंचीचं गवत वाढलेलं. गवताच्या मुळाशी टोचण्या मारायचा. असं काही वेळा केलं की, पुन्हा तुतवार गुडघाभर पाण्यात जाऊन उभा राहायचा. तिथं पाण्यातील कीटक चोचीनं पकडून खायचा.

तुतवारची पाठ तपकिरी रंगाची. पोट पांढऱ्या रंगानं चितारलेलं. दोन्ही बाजूनं खांद्यालगत पांढरा भाग वर सरकलेला. काळी टोकदार चोच. डोळ्यावरून पांढरी पट्टी पाठीमागे सरकते. काळ्या मण्यासारखे काळेभोर डोळे. जणू चिटकून बसविलेले! तो तुरुतुरु चालायचा. पाण्याजवळ गेला की, पंख पसरून हवेत तरंगायचा. त्याचं पाण्याजवळून उडणं मला मोहित करत होतं. तो फार दूर पाण्याकडं जात नसे. काही वेळातच पुन्हा तो गवतात येऊन बसे.

जिंतूरपासून १० किलोमीटर अंतरावर विसावलेल्या या तळ्याच्या परिसरात त्याचं राहणं मला महत्त्वाचं वाटत होतं. तो हिवाळ्यातच या परिसरात दिसायचा हे निरीक्षणातून हळूहळू कळू लागलं. त्यासाठी तीन वर्षांचा कालावधी निघून गेला. अनिल उरटवाड मागील तीन वर्षांपासून निवळीच्या तलावातील पाणपक्ष्यांचा अभ्यास करत आहे. त्यानेच ही माहिती पुरविली.

पाण्यालगत काही दगड अस्ताव्यस्तपणे दिसू लागले. त्यातील एका दगडावर ठिपकेवाला तुतवार पक्षी येऊन बसला. त्याचं दुर्बिणीतून निरीक्षण केलं. त्याच्या अंगावरील खवलेधारी ठिपक्यांमुळेच त्याला 'ठिपकेवाला तुतवार' नाव मिळालं असावं. या पक्ष्याच्या गळ्यापासून शेपटीपर्यंतचा खालचा भाग पांढऱ्या रंगाचा दिसू लागला. ही याची आणखी एक ओळखीची खूण.

ठिपकेवाला तुतवार पक्ष्याच्या शेजारील दगडावर गवतात दिसणारा तुतवार येऊन बसला. जणू दोन्ही पक्षी एकमेकांशी बोलताहेत असंच वाटायचं. दोघेही समोरा-समोर उभे. दोघांतील फरक स्पष्ट दिसू लागला. आम्ही जेवढा वेळ त्या ठिकाणी होतो तेवढ्या वेळात ठिपकेवाला गवतात उतरला नव्हता.

काही वेळानं दोन 'कांडीमार' दगडाजवळ उतरले. ते दोन्ही कांडीमार नदीच्या कोरड्या पात्राकडून आले होते. हळूहळू पाण्याकडे सरकले. तेवढ्यात तुतवार आणि ठिपकेवाला तुतवार दोघांनी जागा सोडल्या. निघून गेले. कांडीमार पाय उचलून पाण्यात चालू लागले. काही पावलं सोबतच उचलत तेव्हा सैनिकाची परेडच सुरू आहे असं वाटत असे. चोच पाण्यात बुडवीत. काहीतरी सापडल्याचआनंद त्यांच्या वागण्यातून स्पष्टपणे जाणवायचा. पण दोघांनीही लवकर पळ काढला. ज्या दिशेनं तुतवार गेले त्याच दिशेनं या दोघांनीही उड्डाण केले. आम्ही दोघेही त्याच दिशेनं निघालो. तेवढ्यात एक 'पिवळा धोबी' बोटभर गवतातून पुढ्यात उतरला. त्याला वळसा घालून पाय उचलले.

थोडं अंतर चालून गेल्यावर काठालगत महारुखाचं झाड

महारुखाचं एक वेगळं झाड त्या बाभळीच्या बनात पाहायला मिळालं याचा आनंद होता. त्या झाडावर ९ ढोकरी ऊन खात बसलेल्या दिसल्या. आम्ही झाडाजवळ येऊन थांबलो. तेवढ्यात तळ्याकडून आणखी ८ ढोकरी त्या झाडावर येऊन बसल्या. १७ ढोकरीचं ओझं घेऊन महारुख पाण्याच्या दिशेनं झुकलेला दिसत होता. या झाडांनी पाखरांना किती लळा लावलाय! ढोकरी फांद्या – फांद्यांवर बसून आराम करत होत्या. अशी झाडं पाखरांना खुणावतात. घरट्यासाठी जागा पुरवितात. पाखरांवर माया करणारी अशी अनेक झाडं या तळ्याच्या काठालगत ताठपणे उभी आहेत.

(२)

बाभळीच्या बनातून पुढं सरकलो. एक उंच बाभूळ पाण्यात उभी होती. त्या बाभळीनंतर पुढे सगळं पाणीच पाणी! पुन्हा बाभळीच्या बनात येऊन वळसा घेऊन पुढं जायचं असं ठरविलं.

उंच बाभळीजवळ पाणकणीस गवतानं जागा धरलेली. त्या गवतात दोन जांभळ्या पाणकोंबड्या उभ्या होत्या. त्या गवतातून बाहेर आल्या. अजूनही गवतात काहीतरी हालचाल सुरूच होती. काही दिसत नव्हतं पण गवत हळूवारपणे हलल्यासारखं जाणवत होतं. बाहेर आलेल्या दोघींपैकी एकीनं आवाज दिला. तेवढ्यात त्या गवतातून आणखी दोन जांभळ्या पाणकोंबड्या बाहेर सरसावल्या. त्या दोघीजणीसुद्धा धीटपणाने चालू लागल्या. आम्ही दोघे खाली बसून त्यांच्या करामती पाहत होतो. अनिलने त्यांचे काही फोटोही काढले. मी त्यांना नोंदवहीत टिपत होतो. कमी उंचीच्या पाणकणीस गवताच्या मुळाशी चोच मारत. गवताच्या मुळाचा भाग खाताना दिसू लागल्या. जसं आपण कंदमुळे खातो अगदी तशा पद्धतीने त्यांनी ताव मारायला सुरुवात केली. त्यांच्या चालण्यात मात्र अजिबात सुंदरता दिसत नव्हती. त्यांनी अंगावर निळा जांभळा रंग ओतून घेतलेला. लालसर पाय. चोच आणि कपाळ सुद्धा लाल रंगात बुडवून काढलेले. शरीराच्या मानाने चोच आखूड वाटते. इतर पाणपक्ष्यांच्या चोचीपेक्षा या पक्ष्यांच्या चोचीची रचना थोडीशी वेगळी जाणवते. या पाणकोंबड्या दलदलीत उगवलेल्या गवतातूनच फिरत होत्या. काहीतरी टिपत होत्या. चोचीला लागलेला चिखल पायाच्या साहाय्याने काढून टाकत. जसे बुलबुल पक्ष्यांच्या शेपटीखालची पिसं लाल रंगाची दिसून येतात. तशा पद्धतीने जांभळ्या पाणकोंबडीच्या शेपटीखालची पिसं पांढऱ्या रंगाची दिसून आली. ही एक वेगळी ओळख. त्यांना आमची चाहूल लागली. त्या पाण्याच्या दिशेनं निघाल्या. पाण्यात उतरल्या. पोहू लागल्या. पुढे काही अंतरावर गवतानं व्यापून गेलेलं लहानसं बेट होतं. तिथं उतरल्या. दोघीजणी अजूनही पाण्यातच होत्या. गवतात पोहोचलेल्या दोघीजणी एकमेकींचा पाठलाग करू लागल्या. जणू शाळेतल्या दोन मुलीच! त्या बेटाजवळ वारकरी पक्ष्यांचा थवा लाटांसोबत हेलकावे घेत होता. तो थवा बेटाजवळून पोहत–पोहत खोल पाण्याकडं सरकला. तशा पाण्यातल्या दोन पाणकोंबड्या त्या बेटावर चढल्या. चौघींनी मिळून ते बेट डोक्यावरच घेतलं. किती नाचल्या! आमच्या समोर पाणपक्ष्यांची हालचाल कमी जाणवू लागली. जांभळ्या पाणकोंबड्या निघून गेल्यानंतर तीन शेकाटी पक्षी येऊन गेले. त्यांच्या उंच पायांनी आमचं लक्ष वेधून घेतलं एवढच! पण ते जास्त वेळ रमलेच नाहीत. बेटाच्या पलीकडे तळ्याच्या मध्यभागात २०० पेक्षा जास्त 'लालसरी' दिसू लागल्या. त्यासाठी दुर्बिणीचा उपयोग होई. पण सारखं – सारखं दुर्बिणीतून पाहिल्यामुळे डोळे जड पडत. थोडा वेळ डोळे मिटून बसलं की पुन्हा बरं वाटत असे. दूरवरचे पक्षी ओळखण्यापुरताच दुर्बिणीचा वापर केला जाई. शक्य तेवढं जवळचे पक्षी डोळ्यांनीच पाहायचे असं आम्ही ठरवलेलं. पक्षी आणि आपल्यातील होईल तेवढं अंतर कमी करायचं. म्हणजे पाखरांच्या हालचाली सहज टिपता येतात. डोळ्यांनी स्पष्टपणे दिसत नसेल तेव्हा थोड्या वेळापुरती दुर्बीण वापरत असू. आम्ही निघायच्या तयारीत असताना उंच बाभळीभोवती काही कावळ्यांनी गोंधळ घालायला सुरुवात केली. आम्ही जागा बदलली. त्यांचं निरीक्षण करू लागलो. कावळे बाभळीभोवती घिरट्या घालू लागले. त्यांच्या आवाजातील कर्कशपणा अधिकच वाढलेला. तेवढ्यात 'दलदली भोवत्या' दिसला. त्या शिकारी पक्ष्याचा कावळे पाठलाग करू लागले. त्याची परिसरातून हकालपट्टी करू पाहत होते. हे नाट्य अचानकच पाहायला मिळालं होतं. या शिकारी पक्ष्याला 'मॉन्टग्यूचा भोवत्या' असंही नाव आहे. भोवत्या फक्त हिवाळ्यातच निवळीच्या तळ्याजवळ उतरतात. काही दिवस वास्तव्य करून निघूनही जातात. भोवत्या झाडाभोवती घिरट्या घालू लागला. तसे कावळेही त्याच्या मागावरच पडलेले. कावळ्यांनी एखाद्या गोष्टीचा पिच्छा पुरविला की, ते काम फत्ते करूनच सोडतात. या गोष्टीचा

भोवत्या झाडाभोवती घिरट्या घालू लागला. तसे कावळेही त्याच्या मागावरच पडलेले. कावळ्यांनी एखाद्या गोष्टीचा पिच्छा पुरविला की, ते काम फत्ते करूनच सोडतात. या गोष्टीचा इथेही प्रत्यय आला. भोवत्यानं तिथून पळ काढला. तसे कावळेही निघून गेले.

आता पूर्वीसारखीच वातावरणात शांतता नांदू लागली. आमच्या शेजारी उंच बाभळीचं झाड दिसत होतं. पाणकणीस गवतात एक शेराटी विराजमान झाला. सहा हळदी-कुंकू बदकं पोहत-पोहत बाभळीच्या दिशेनं येऊ लागली. तसे आम्ही परतीच्या वाटेनं निघालो. बाभळीच्या बनातून वाट काढत बाहेर पडलो.

(३)

आम्ही निवळी गावाचा परिसर मागं सोडून कुडा गावाच्या दिशेनं चालू लागलो. उजव्या बाजूला हरभरा-ज्वारीची पिकं फुलून आलेली. हरभऱ्याला घाटे लगडलेले. ज्वारी हुरड्यात आलेली. कणसावर पळसमैना उतरायच्या. दाणे टिपायच्या. पुन्हा झाडावर विराजमान व्हायच्या. सकाळचं कोवळं ऊन त्यांच्या अंगावर पडायचं. तेव्हा त्या पळसमैना उजळून निघत. आम्ही त्यांच्या हालचाली पाहण्यात रममाण झालो. चिंचेच्या झाडाजवळ कंबरेत वाकलेली एक बाभूळ होती. त्या बाभळीवर एक पळसमैना त्या थव्याकडं पाठ करून बसलेली. ती रुसली तर नसेल? आजारी असावी असंही मनात आलं. तिनं ज्वारीची दाणे टिपण्याचा मोह सोडून दिला. ती टेहळणी करीत असावी असं काहीसं वाटलं. सर्व शक्यता पडताळून पाहिल्या. पण तिनं आम्हाला हुलकावणी दिली होती. तिचं असं एकाकी असणं माझ्या मनाला कुरतडत होतं. शेकडो किलोमीटरचा प्रवास करून थकून गेली असावी? रानातला थवा बाभळीकडं झेपावला पण बाभळीवर उतरलाच नाही. तशा पळसमैना तळ्याच्या पाण्यावरून 'मापा' गावाच्या दिशेनं निघूनही गेल्या. पण कंबरेत वाकलेल्या बाभळीवरची पळसमैना जागच्या जागी बसून होती. ती त्या थव्याकडं एकटकपणे पाहत होती. ती थव्यासोबत का गेली नसावी? तिला थव्यातून हाकलून दिलंय? तिचं वय झालंय? ती स्वतःहून थव्यातून बाहेर पडली? ती कुणाची तरी वाट पाहते का? झाडांची वाढ खुंटते. फांद्या वाळून जातात. साल गळून पडते. फळे लागत नाहीत. तेव्हा झाडाचा शेवटचा काळ सुरू होतो हे कळू लागतं. पण या पाखरांचं वय झालंय हे कशावरून ओळखायचं. म्हातारी माणसं चटकन ओळखू येतात. बाभळीसारखी कंबरेत वाकलेली दिसतात. तसं पाखरांचं असतं का? कुबड्या बाभळीजवळच एक झुडुप होतं. त्या झुडपात मनोलीच घरटं होतं. सुरक्षित होतं. तरीही त्या झुडपावर 'लांब शेपटीचा खाटीक' विराजमान झाला. थोडा वेळ टेहळणी करून निघूनही गेला. तशी मनोली घरट्यातून बाहेर डोकावली. फांदीवर येऊन बसली. भुर्रकन उडून गेली. पुन्हा घरट्याकडं लवकर परतली नाही. त्या झुडपाखाली पसरट बेशरम वाढत चाललेली दिसली. तिने हात-पाय चांगलेच पसरलेले. तिची फुलं तेवढी सुंदर दिसू लागली. ती दुरूनच सुंदर दिसतात. त्या फुलांना केसात कुणीही माळत नाही. बेशरमीला लागूनच पाणकणीस गवतानं डोकं वर काढलेलं. तिथं ९ 'अडई' स्वतःला लपवीत होत्या. त्या हळूवार चालल्या आणि पाण्याच्या दिशेनं उडूनही गेल्या. अजूनही ती पळसमैना तिथंच बसून होती. तिच्याशिवाय त्या झाडावर इतर कोणतेही पक्षी नव्हते. आम्ही तळ्याच्या काठा-कठानं हळूवार चालू लागलो. कुडा गाव दिसू लागलं. तळ्याचा परिसर कमी होऊ लागला. हरभरा आणि ज्वारीची दाटी वाढलेली. सगळी रानं हिरवीगार दिसू लागली. सायंकाळची वेळ. कुडा गावातील मंदिरातून टाळांचा आवाज येऊ लागला. गावाकडून पळसमैनेचा एक थवा आमच्याच दिशेनं येताना दिसला. तसे आम्ही हरभऱ्याच्या रानातच थबकलो. त्यांना निरखून पाहू लागलो. तेवढ्यात निवळी गावाच्या दिशेकडून आणखी एक थवा उतरला. दोन्ही थव्याचा एकच थवा झालेला. आम्ही टेकडीकडं पाठ करून बसलो. आमच्या डोक्यावरून आणखी काही पळसमैना अवतरल्या आणि त्यात एकरूप झाल्या. तळे, मापा, कुडा, निवळी, टेकडी सगळीकडून या पळसमैना भरभर येऊ लागल्या. या पळसमैनेंचा भला मोठा तारकापुंज झाल्यासारखं भासत होतं. तळ्याकडून आलेल्या हजारो पळसमैना हरभऱ्याच्या रानात उतरल्या. त्यांचं एका लयीत उतरणं मनाला मोहून टाकत होतं. त्या हरभऱ्यात दिसेनाशा झाल्या. आणखी एक थवा आला आणि त्यांना सोबत घेऊन गेला. हरभऱ्यात बसलेल्या पळसमैना जणू त्यांचीच वाट पाहत थांबलेल्या. त्यांना संकेत मिळाला अन् सगळ्या सोबतच हवेवर स्वार झाल्या. आमच्या डोक्यावरून जाताना त्यांच्या पंखातील संगीत ऐकायला मिळाले. आनंदाची एक लहर अंगभर पसरत गेली. जखमेवर हळूवार फुंकर घालावी असंच वाटलं.

वाट पाहत थांबलेल्या. त्यांना संकेत मिळाला अन् सगळ्या सोबतच हवेवर स्वार झाल्या. आमच्या डोक्यावरून जाताना त्यांच्या पंखातील संगीत ऐकायला मिळाले. आनंदाची एक लहर अंगभर पसरत गेली. जखमेवर हळूवार फुंकर घालावी असंच वाटलं. त्यांच्या पंखांची हवा आम्हाला जाणवली. माझ्या हातात एखादी काठी असती तर त्यांच्यापर्यंत सहज पोहोचली असती. हजारो पळसमैना थव्यानं येऊ लागल्या. हितगूज करू लागल्या. त्यांच्याजवळ मोबाईल सारखे कोणतेही साधन नसताना त्या ठराविक वेळेला एकत्र आल्या होत्या याचंच नवल वाटत होतं. या सगळ्या थव्यामध्ये कुबड्या बाभळीवर बसलेली पळसमैना असेल का असं सारखं वाटायचं. त्या पळसमैनेची आठवण आली की या आनंदी थव्याला पाहूनही आनंद व्हायचा नाही. सगळ्या पळसमैना उत्सवासाठी एकत्र आलेल्या होत्या. त्यामुळे ती एकटीच पळसमैना त्या झाडावर कशी असेल? ती माझ्यासमोरील थव्यात असावी असं मनोमन वाटत होतं. सूर्य पश्चिमेकडं सरकत राहिला. अंधार येऊ पाहत होता. तशा अवस्थेतही पळसमैना भराभर हरभऱ्याच्या रानात उतरत. पुन्हा भरारी घेत. उजव्या बाजूला एक आंबा होता. त्यावर उतरत. पुन्हा मोठ्या थव्यात सगळ्या एकरूप होत असत. आकाशात जणू काळाकुट्ट ढगच मिरवत आहे असं दृश्य समोर दिसत होतं. त्यांच्या कसरती पाहून मी थक्क झालो. निरनिराळे आकार तयार होत. काही हजार पळसमैना एका तालात नाचू लागल्या. गिरक्या घेऊ लागल्या. जमिनीकडं पुन्हा आकाशाकडं भरारी घेऊ लागल्या. कधी पतंगाचा आकार तर कधी झाडासारखा आकार पाहून मी थक्क झालो. त्या सगळ्यांना कोण नियंत्रित करत होतं? हे कळत नव्हतं. ती सगळी पाखरं एकाच वेळी वेगवेगळ्या दिशेनं कशी वळत असतील? हे कुतूहल शेवटपर्यंतच होतं. एकाही पक्ष्याचा अपघात झाला नव्हता. आम्ही दोघे त्यांना दुर्बिणीतून पाहत होतो. त्यांचे पंखसुद्धा एकमेकांना स्पर्श करत नव्हते. कोणती गणितीय क्रिया त्यांना अवगत होती? हे न उलगडणारं कोडं समोर दिसत होतं. सगळ्या पाखरांनी चांगलाच वेग पकडलेला. ही सगळी पाखरं कुडा गावाच्या दिशेनं हळूहळू सरकू लागली. जेव्हा ही पाखरं मंदिराच्या कळसावरून भरारी घेऊ लागली तेव्हाच कळालं. तोपर्यंत आम्ही फक्त आणि फक्त त्या पाखरांनाच डोळे भरून पाहत होतो. त्या थव्यानं पुन्हा तळ्याकडं मार्गक्रमण केलं. पाण्याजवळून उडताना त्यांचं प्रतिबिंब पाण्यात उतरलं होतं. तेवढ्यापुरतीच पाण्याची हालचाल जाणवली होती. सूर्य मावळतीला निघून गेला तसा अंधार चांगलाच वाढला. तळ्यावर घिरट्या घालणारा थवा अंधुकसा दिसू लागला. आम्ही हरभऱ्याच्या रानातून काढता पाय घेतला. कुडा गावाच्या दिशेनं जाणाऱ्या पायवाटेवरून चालू लागलो. पळसमैना 'भोरडी' या नावानं सुद्धा ओळखली जाते. गुलाबी रंगाचा साळुंकीएवढा पक्षी. डोळे, मान, छाती, पंख आणि शेपटीकडील भाग काळ्या रंगाचा. त्या रंगातही गुलाबी छटा दिसून येते. त्यांचा चक्-चक् चक्-चक् आवाज ऐकू येतो. पळस फुलू लागले की फुलातील मकरंद चाखायला विसरत नाहीत. ज्वारी हुरड्यात आली की दुधाळ दाणे आवडीनं खातात. आम्ही कुडा गावात प्रवेश केला. मंदिरासमोरील वडाच्या झाडाखाली पोहोचलो. वळून तळ्याकडं पाहिलं. भोरड्या रातनिवाऱ्याला निघून गेल्या होत्या. त्यांची रातनिवाऱ्याची झाडं पाहता आली नाहीत. अनिलने मोटार सायकल सुरू केली. जिंतूरच्या दिशेनं प्रवास सुरू झाला. उघड्या बाभळीवरची पळसमैना पुन्हा-पुन्हा माझ्या डोळ्यासमोर येई. ती थव्यात परतली असावी असं मनोमन वाटत होतं.

(४)

आम्ही दोघे पहाटे तळ्याच्या काठावर पोहोचलो. अजून चांगलं फटफटलं नव्हतं. कुबड्या बाभळीच्या समोर काही अंतरावर अजून पाच बाभळी उभ्या होत्या. तिथं आम्ही पाणकणीस गवताचा आडोसा धरून पाणपक्ष्यांच्या निरीक्षणासाठी तयारी केली. अडईचा एक थवा बाभळीच्या झाडाजवळून उडून गेला. एकच लालसरी. पण ती सतरा वारकऱ्यांच्या मधोमध पोहत होती. काही वेळानं ती तळ्याच्या खोल पाण्याकडं सरकली. शेजारी अस्ताव्यस्तपणे वाढलेल्या बेशरमीवर पांढऱ्या छातीच्या दोन खंड्यांनी आश्रय घेतलेला. तशी फांदी पाण्याकडं झुकली. पाठीमागे एक धानचिमणी गवतात चरत होती. गवताच्या पुंजक्यावर बसली. कावरी - बावरी होऊन चहूबाजूला पाहू लागली. पाण्याच्या विरुद्ध दिशेनं उडून गेली. बुलबुल पक्ष्यांनी बाभळीवर बसून बोलायला सुरुवात केली. उडून गेले तेव्हा त्यांची संख्या चोवीस होती. नऊ भोरड्यांचा थवा तळ्यावरून मापा गावाच्या दिशेनं निघून गेला.एक टिटवी कर्कश आवाज काढत डोक्यावरुन निघून गेली. तिच्या अशा वागण्यानं

पाखरांना आमची खबर लागली होती. जमिनीवर पक्ष्यांची शीट पडलेली. काही पाखरांची पिसे गळून पडलेली. पाण्यालगत दलदलीवर पक्ष्यांच्या पायांची नक्षी रेखाटलेली. त्यातही सरमिसळ झालेली. ओळखू येईल अशी नक्षी नव्हतीच. दोन मोठ्या बाभळीच्या खोडावर, फांद्यावरही पक्ष्यांची शीट पडलेली. त्यामुळे ती झाडं पांढरट दिसू लागली. कुबड्या बाभळीवर जशी पळसमैना एकटीच बसून होती. अगदी त्याप्रमाणे इथेसुद्धा मोठ्या बाभळीवर एकच 'उघड्या चोचीचा करकोचा' बसलेला होता. ही झाडं करकोचा पक्ष्यांच्या रातनिवाऱ्याची जागाच आहे हे कळू लागलं. इतर पक्षी चरण्यासाठी निघून गेले होते. एकट्या करकोचानंसुद्धा तळ्याकडं झेप घेतली. काही वेळानं एक कोतवाल लहानशा बाभळीवर येऊन बसला. तशी आम्ही जागा बदलली. पूर्वी कुडा गाव जिथं वसलेलं होतं त्या पडलेल्या गढीच्या दिशेनं एक पायवाट जाते. त्या पायवाटेवरून हळूवार चालू लागलो. अनिलने उंच वाढलेल्या पिंपळाकडं बोट दाखवीत हरोळ्यांचा थवा दाखविला. हरोळ्यासारखी सुंदर पाखरं पाहिली की चालण्यातील थकवा आपोआप कमी होत असे.

(५)

आम्ही पहिल्या दिवसापासून पायवाटा न्याहाळीत आलो होतो. कंबरेत वाकलेल्या बाभळीजवळ एक चिंच होती. तिथं अजगर निघून गेल्याच्या खाणाखुणा दिसल्या होत्या. पायवाटेजवळ उंदरांच्या चोरवाटाही दिसून येत. बोटभर वाढलेल्या गवतात सशाच्या गोलाकार लेंढ्याही दिसून यायच्या. पाण्यावर आलेल्या काळविटांच्या खुरांचे ठसेसुद्धा ओळखून पडत. बुरजाची पांढरी माती दूरवर पसरत आलेली. त्या मातीत सतरा चिमण्या धुळस्नान करताना दिसल्या. गाव स्थलांतरित झालं पण या चिमण्यांनी अजून तरी त्यांच्या पूर्वजांचा गाव सोडलेला नव्हता. त्यांची पिलावळ तिथंच गोतावळा होऊन नांदत होती. ढासळून गेलेल्या बुरुजाजवळून लहानसा ओढा करपरा नदीला मिळतो. तिथं बोरी बाभळीची झाडं चांगलीच वाढलेली होती. तांबड्या गुंजांची वेल बोरीवर चढलेली. पानं वाळत चाललेली. गुंजाच्या शेंगा फुटून आतील गुंजा बाहेर डोकावत. खूप गुंजा पांढऱ्या मातीत मिसळलेल्या दिसू लागल्या. शेंगा तडकल्या की बिया ओढ्याच्या दिशेनं घरंगळत जात असत. मी गुंजा गोळा केल्या. काही शेंगा तोडून घेतल्या. अनिल ओढ्यात उतरलेल्या पायवाटा न्याहाळू लागला. त्या पायवाटेनं रानडुकरांची टोळी गेल्याचं त्यानं सांगितलं. या परिसरात अजूनही काही टोळ्या असू शकतात म्हणून आम्ही सावधपणानं या पडलेल्या बुरजावरून जायचं असं ठरविलं. एका पायवाटेला अनेक पायवाटा मिळालेल्या दिसू लागल्या. एका पायवाटेला अनेक फाटे फुटलेले. सगळा गोंधळच. काटेरी झुडपं वाट अडवायला तयारच. खाली बसून तर कधी वेगळ्या पायवाटेनं रस्ता शोधू लागलो. पडलेला बुरुज ओलांडायला अर्धा तास निघून गेला. ऊन वाढत चाललेलं. एवढ्या वेळात घामानं अंग भिजलेलं. सगळी वास्तू भग्नावस्थेत दिसू लागली. सगळ्या चोरवाटा फक्त रानडुकरांच्याच होत्या. फक्त त्यांनाच पळता यावं अशी व्यवस्था त्यांनी केलेली. तिथं आमचा निभाव लागणं कठीण होतं हे कळून चुकलं. दुसऱ्या बुरजाची चढण लागली. आम्ही त्या पायवाटेवरून वरच्या दिशेनं चढू लागलो. मी पुढे होतो. अनिल पाठीमागून येत होता. अनोळखी काटेरी झुडपांनी आम्हाला घेरलेलं. कशीतरी वाट काढत थोड्याशा मोकळ्या जागेत पोहोचलो. तेवढ्यात रानडुकरांची भली मोठी टोळी गोंधळ घालत बुरजाभोवती घुटमळत राहिली. आम्हा दोघांना चक्रव्यूहात अडकल्यासारखं झालं. भीतीचा काटा अंगभर सरसरत गेला. मी अनिलला आणि अनिल मला उसनं अवसान द्यायचा प्रयत्न करू लागला. त्या भग्नावस्थेतील वास्तूत फक्त पिंपळ तेवढाच हिरवागार दिसू लागला. त्या पिंपळावर अवतरलेल्या हरोळ्या केव्हाच निघून गेलेल्या. जेव्हा आम्ही बाभळीच्या पाच झाडाजवळ पोहोचलो होतो तेव्हा अनिल या पिंपळाकडे बोट दाखवीत म्हणाला होता की, दुपारचे जेवण त्या हिरव्यागार पिंपळाखालीच करूया. इथे आल्यावर पळता भुई थोडी झाली होती. आम्ही तळ्याच्या बाजूनं गढीवर चढलो होतो. पायवाट जिकडं घेऊन जाईल तिकडं आम्ही चालू लागलो. नवीन पायवाट निर्माण करण्याची धमक आमच्यात उरली नव्हतीच. दुसऱ्या बुरजावर पोहोचलो तेव्हा पाठीवरील बॅग काटेरी झुडपांनी फाडलेली दिसली. तिथं रानडुकरांच्या लोळण्याची जागा पाहायला मिळाली. पांढऱ्या मातीत खड्डा केलेला. एका बाजूला खोलगट भाग दिसू लागला. आजूबाजूला त्यांची विष्ठा पडलेली. आम्ही चढण चढू लागलो. तेव्हा इथल्याच रानडुकरांनी गोंधळ घातलेला होता हे कळालं. ती टोळी अजूनही अधून – मधून खुडबुड करीतच

होती. वाळलेला पालापाचोळा त्यांच्या येण्या-जाण्याची चाहूल द्यायचा. दुसऱ्या बुरुजापासून एका तटबंदीनं  तळ्याच्या बाजूनं गोलाकार धारण केलेला. त्यावरून एक पायवाट पाण्याच्या दिशेनं खाली उतरलेली दिसली. आम्ही जास्त वेळ विचार केलाच नाही. पटकन त्या पायवाटेवरून खालच्या दिशेनं सरकलो. आम्ही तळ्याच्या पाण्यालगत पोहोचलो. तिथं पायवाट पाण्यात एकजीव झालेली. पुन्हा एकदा तळ्याच्या काठा-काठानं पायवाट तयार केली. मोकळ्या जागेत आलो होतो.

(उत्तरार्थ पुढील अंकात)

*****

## आपल्या माहितीला उजाळा : भाग ८

महाराष्ट्र पक्षीमित्रसंघाच्या त्रैमासिकेचे प्रयोजन केवळ पक्षी निरीक्षण व ओळख या पर्यंतच मर्यादित राहत नाही. त्या संलग्नीत ज्ञान भांडाराची उजळणी करून घेण्यासाठी आपल्या माहितीला उजाळा हे सदर वाचकांच्या पुढ्यात ठेवत आहे. प्रत्येक अंकामध्ये दहा प्रश्नांचा संच दिला जाईल. वाचकांना त्याची उत्तरे शोधून आपल्याकडे असणाऱ्या महितीला उजाळा द्यायचा आहे. प्रत्येक प्रश्नासोबत पुरविलेला सुगावा संपूर्ण क्रियाकलापास रंजक बनवेल, अशी अपेक्षा आहे. वाचकांनी आपली उत्तरे अंकामध्ये इतरत्र दिलेल्या उत्तरासोबत पडताळून पाहू शकतात. या सदराबद्दल प्रश्न, चर्चा किंवा सूचनांचे स्वागत आहे.

| क्र. | प्रश्न | थोडी मदत |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेच्या बोधचिन्हावर .....हा पक्षी आहे. | भारतात सर्वत्र आढळणारा पक्षी. |
| २. | ‘किंगफिशर’ हे .........या संस्थेचे नियतकालिक आहे. | .....  या देशातून प्रकाशित होते. |
| ३. | क्रिकेटमधील फळीवर, एका विशिष्ट निर्मात्याकडून ...... या पक्ष्यांचे चित्र दिसते. | खंड्याच्या कुळातील पक्षी........ या देशात आढळतो. |
| ४. | शीतपेय व सोडाची एक व्यावसायिक संस्था | या पेयाच्या छोट्या धीवराचे चित्र दिसते. |
| ५. | जगभरातल्या खंड्या प्रजातींची माहिती देणारा इंग्रजी ग्रंथ Kingfisher of the World यांनी लिहिला. | १९९५ सालचे हे पुस्तक पक्षी अभ्यासकात लोकप्रिय आहे. |
| ६. | भारतात किंगफिशरच्या एकूण .....जाती आढळतात. | यांच्या रंगरुपामुळे सर्वांना आवडतात. |
| ७. | गटातील वेगळा पक्षी ओळखा –<br>तिबोटी धीवर<br>पांढऱ्या छातीचा धीवर<br>कवड्या  धीवर<br>कंठेरी धीवर | हा कृष्णधवल रंगाचा आहे. |
| ८. | पश्चिम बंगालचा राज्यपक्षी कोणता? | मासे हे या पक्ष्याचे मुख्य अन्न. |
| ९. | जंगलातला सर्वात मोठा किंगफिशर कुठे आढळतो? | सुमारे ५० सेंटिमीटर उंच असतो. |
| १०. | शबल खंड्याचं विश्व या मराठी हे पुस्तकाचे लेखक कोण? | पुस्तक २०१६ साली प्रकाशित झाले. |

# पक्षिमित्र संमेलनातील मुख्य विषय आणि अपेक्षित शोध निबंध

**शरद आपटे**
संचालक बर्ड साँग.

निसर्गात फिरताना आपल्याला अनेक वस्तू दिसतात. जसे पाने, फुले, जमिनीवर पडलेली फळे, बिया. बऱ्याच वेळा ही फळे, फुले कोणती आहेत हे माहीत नसते. अशी एक वस्तू आहे जी काय आहे आणि कोणाची आहे हे कोणी न सांगता आपल्याला माहीत असते आणि ती आपण मोठ्या प्रेमाने उचलतो ती वस्तू म्हणजे पीस. पीस हे फक्त पक्ष्यांनाच असते हे आपल्याला निश्चितपणे माहीत असते. मोराचे आणि पोपटाचे पीस बहुतकरून सर्वांना ओळखता येते आणि बऱ्याच जणांनी ते हाताळलेही असेल. इतके कुतूहल आणि प्रेम असूनही पक्ष्यांच्या पिसाबद्दल अगदी अनुभवी पक्षी निरीक्षकांनाही फार थोडी माहिती असते. या संमेलनाचा मुख्य विषय पिसे, पिसारे आणि पिसे नसलेली त्वचा असा आहे.

पिसांची उत्क्रांती, त्यांची रचना, त्यांचे वेगवेगळे प्रकार आणि त्यांचे उपयोग या विषयी चर्चासुद्धा अभावानेच होत असतात. पक्ष्यांचे फोटो काढणे हा आजच्या घडीचा आघाडीचा छंद आहे. पण फोटोतील पक्ष्यांची पिसे काय सांगतात, हे बऱ्याच जणांना माहीत नसते. आपल्या घराच्या परिसरात रोज दिसणारे पक्षी पिसे केव्हा बदलतात आणि का हे ही फार थोडे जण नोंदवितात. जांभळा शिंजीर नर जांभळा केव्हा दिसतो आणि का? हेही आपल्याला नेमके माहीत नसते. या अतिशय महत्त्वाच्या विषयाकडे आम्ही समस्त पक्षी अभ्यासकांचे लक्ष वेधू इच्छितो. या विषयावरील शोध निबंध आम्ही मागवीत आहोत. कोणते विषय या निबंधात हाताळता येतील त्याचा एक लेखाजोखा मांडत आहे.

आपल्या घराच्या परिसरात घरट्यातून नुकतेच बाहेर पडलेले पक्ष्याचे पिलू हे पोरवयातील (juvenile) म्हणून ओळखले जाते. पुढे ते थोडे मोठे होते आणि त्याला आपण त्याला बच्चा, कोवळा (immmature) म्हणू लागतो. असे करत ते पिलू आई वडिलांपासून स्वतंत्र होत एक दिवस प्रौढ होते. या सर्व काळातील त्यांच्या पिसाचे रंग, रचना बदलत असतात. त्याची कारणे त्या प्रजाती बाबत हे एखाद्या परिसरात केव्हा घडते हे आपण मांडू शकता.

काही पक्ष्यांच्या पिसांना विणीच्या हंगामात वेगळे रंग (गाय बगळा, जांभळा शिंजीर) येतात तर काही पक्ष्यांना वेगळे पिसारे येतात त्याचे परिचित उदाहरण म्हणजे मोर, बगळे. यांचा त्यांच्या विणीशी नेमका काय संबंध आहे? जो घरटे करतो त्यालाच असे पिसारे येतात का सगळ्यांनाच येतात. हे पिसारे फक्त नरालाच येतात का मादीलाही. मोराचा भरगच्च पिसारा असलेले फोटो खूपच मिळतील. पण नवीन उगविणारा पिसारा एखाद्या परिसरात केव्हा उगवायला लागतो. त्याच्या स्टेजेस दाखविता येतील तसेच जेव्हा तो झडू लागतो तो क्रमकाळ दाखविता येईल.

काही पक्ष्यांच्या नराचे रंग बदलतात उदाहरणार्थ जांभळा शिंजीर. हा जांभळा केव्हा होतो, त्याच्या बगलेत जो केशरी/पिवळ्या रंगाच्या पिसांचा झुपका नेमका केव्हा येतो. त्या झुपक्याचा आणि त्याच्या घरट्याचा संबंध आहे का? तो झुपका जातो. त्याचे मीलन होताच का घरटे पूर्ण होताच?

शिकारी पक्षी प्रौढ व्हायला ५-६ किंवा त्याहीपेक्षा जास्त वर्षे जातात. मधल्या काळात त्याची पिसे वेगवेगळे रंग धारण करीत असतात. ती स्थिती आणि त्यांचे वय याचा काही संबंध आहे का? जसे मधुबाज हा पांढऱ्या रंगात (white morf) तपकिरी रंगात (brown morf) दिसतो. काही प्रजातीची घुबडे असे वेगवेगळे मॉर्फ धारण करताना दिसतात हे नेमके का आणि केव्हा हे मांडता येईल. तसेच ककुची हिपॅटिक मादी हा पेहराव केव्हा आणि का धारण करते?ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पाणथळ जागी दूर देशावरून आलेले स्थलांतरित पक्षी दिसू लागतात. त्यांचे वय पहिला हिवाळा असे लिहिलेले असते. हा पक्षी पूर्ण हिवाळा त्याच पाणथळ जागेवर असतो आणि एप्रिल मध्ये जाताना तो प्रौढ झालेला असतो. हा बदल कसा कसा होतो हे मांडता येईल. स्थलांतर करून येणाऱ्यापैकी काही पक्षी परत जात नाहीत. असे का होते? त्यांना वीण करायची नसते का परत जाण्या इतकी ताकत नसते. त्यांच्या पिसाच्या रंगात काही बदल होतो का? तसेच पेप breeding plumage असा शब्द वापरला जातो. म्हणजे पक्षी जेव्हा घरटे करीत नसतो तेंव्हा तो कसा दिसतो. आता पुढे त्याचा विणीचा हंगाम येऊ लागतो आणि तो वेगळी पिसे किंवा त्यांचे रंग धारण करतो ते आपल्याला मांडता येईल. आपले जसे केस गळत असतात तशी पक्ष्यांची पिसेही गळत असतात झडत असतात. हे


केव्हा कसे घडते हे मांडता येईल. एप्रिल आणि मे या महिन्यात आमच्याकडे पोपटाच्या शेपटीतील पिसे झडतात. एका रातथाऱ्यावर जमणाऱ्या सर्व पोपटांच्या शेपट्या आखूड दिसतात. घरटी करायच्या काळात पिसांचे रंग उठावदार होतात आणि घरटी करण्याचा काळ संपताच ती निस्तेज होतात. चीरक पक्ष्याच्या पंखातील पांढरा पट्टा किंवा गप्पीदासच्या पोटाचा पांढरा रंग नेमका कोणत्या काळात उठून दिसतो? आणि का? हळद्या नर खरोखरीच हळदी रंगाचा केव्हा दिसतो? आणि का?पक्ष्यांची पिसे जशी त्याला उडायला मदत करतात तशी ती त्याला बेमालूम लपायलाही मदत करतात. अन्न मिळविणे हे एक मोठे काम पक्षी दिवसभर करीत असतात, तेव्हा अन्न घेण्याच्या परिसराशी त्याच्या रंगाचा काही संबंध आहे का? एकच प्रजाती वेग वेगळ्या अधिवासात वेगवेगळे रंग दाखविते. उदा रान सातभाई हा पश्चिम घाटात जसा दिसतो तसा सागरेश्वरमध्ये नाही, असे का? शहरातील बुलबुलचा रंग आणि जवळच्याच जंगलातील बुलबुलचा रंग यात फरक का दिसतो? राखी वटवट्या हा तर मानवी वस्तीत सर्रास आढळणारा पक्षी. विणीच्या काळात तो उडताना फ़रक फ़रक असा आवाज त्याच्या पंखातून येतो. याचा काही वेगळा उद्देश असतो का? आहे तीच पिसे तो वेगळ्या प्रकारे हलवून असे आवाज करतो की, वेगळी पिसे तिथे येतात? सर्वच प्रीनियांची शेपूट वीण संपताच लांब होते आणि घरटी करण्याचा काळ येताच ती आखूड होते. हे नेमके कोणत्या वेळी आणि कोणत्या क्रमाने होते हे मांडता येईल. वय ऋतूनुसार पक्ष्यांच्या पिसे नसलेल्या त्वचेचे रंग बदलतात. उदाहरणार्थ पाँड हेरॉनच्या पायाचा रंग. राखी धनेशच्या चोचीचा रंग.

हा विषय फोटो मधूनच चांगला मांडता येईल. पक्ष्यांची फोटोग्राफी करणारे सर्वात जास्त आहेत. ते हे विषय सहजच मांडू शकतील.

*****

## – पुस्तक परिचय –

# थार वाळवंटातील वन्यजीवांची एक झलक




राजस्थान मधील ३,२०००० किलोमीटर वर्ग परिसरात पसरलेल्या या वाळवंटात जैवविविधता भरभरून आहे. उन्हाळ्यात पन्नास डिग्री व हिवाळ्यात तीन डिग्रीच्या खाली जाणारे तापमान येथील कमालीची विषमता दाखविते. थार मधील अशा वातावरणानुसार इथल्या वनस्पती, पशु पक्ष्यांनी स्वत:ला उत्क्रांत केले आहे. पक्ष्यांमध्ये माळढोक सारखा पक्षी येथील मुख्य वैशिष्ट. त्याच्या संवर्धनाकारिता बीएनएचस विशेष प्रकल्प राबवीत आहे. त्यात स्थानिकांच्या जागरूकते करीता सुद्धा प्रयत्न केला जातो. झाडे वनस्पतीच्या सातशे प्रजाती, एकाव्वन प्रकारचे सरपटणारे सजीव व तीनशे प्रकारचे पक्षी येथे आढळतात. यातील काही प्रजातींची फोटोसहीत थोडक्यात माहिती यामध्ये दिली आहे. पुस्तक निर्मितीचा हेतुच मुळात स्थानिकांना ईथल्या जैवविविधतेची माहिती व्हावी हा आहे. त्यामुळे पुस्तक हिंदी भाषेत काढलेले आहे. पुस्तकाचे मुख्य लेखक सुजित नरवडे असून पाच सहलेखक आहे. त्यात बीएनएचस चे कार्यक्रम अधिकारी नंदकिशोर दुधे यांचा समावेश आहे. लेखकांनी सोप्या भाषेत महत्वाची माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. विषम वातावरणामुळे सजीवांनी स्वत:ला उत्क्रांत करून घेतले. पण झपाट्याने होणाऱ्या मानवी विकासामुळे हळूहळू ते विलुप्तीच्या मार्गावर आहे. या पुस्तकात थार वाळवंटातील जीवांची जी एक झलक पाहायला मिळते. ती नक्कीच माहितीपूर्ण व थार संवर्धनाला हातभार लावणारी आहे.

**– किरण मोरे**

# नाशिक येथे पहिला जिल्हा पक्षी मित्र मेळावा

महाराष्ट्र 'पक्षीमित्र'तर्फे नुकतेच जिल्हावार गट तयार केलेले असून प्रत्येक जिल्ह्यातील गटाच्या सर्वच सदस्यांनी एकत्र भेटून प्रत्येकाची ओळख करून घेऊन जिल्ह्यातील 'पक्षी मित्र' चळवळ कशी वाढीस नेता येईल याबद्दल विचार मंथन करावे, अशी अपेक्षा आहे. तसेच 'पक्षी मित्र' चळवळ ही तळापर्यंत म्हणजे जनसामान्यांपर्यंत पोहचवावी हाही यामागील हेतू आहे.

त्या दृष्टीने नाशिक जिल्ह्यातील 'पक्षी मित्र' गटाचे एक दिवसीय संमेलन पक्षी मित्र मंडळ नाशिक यांच्या पुढाकाराने सहसंघटक डॉ. अनिल माळी आणि कार्यकारी मंडळ सदस्य श्री. अविनाशजी कुबल यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

सकाळी ९ ते १० वाजेपर्यंत नाव नोंदणी आणि अल्पोपहार झाला. त्यानंतर डॉ. अनिल माळी, श्री. अविनाशजी कुबल, महाराष्ट्र 'पक्षी मित्र' त्रैमासिकाचे संपादक श्री. दिगंबर गाडगीळ आणि नाशिक पक्षी मित्रमंडळाचे अध्यक्ष सी.ए. मधुकर जगताप यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रास्ताविक सी.ए. मधुकर जगताप यांनी केले. महाराष्ट्र पक्षी चळवळीचे आद्य प्रवर्तक श्री. दिगंबर गाडगीळ यांनी नाशिक आणि महाराष्ट्रात 'पक्षी मित्र' चळवळीची सुरुवात कशी झाली याबाबत सर्वांना माहिती दिली. डॉ. अनिल माळी यांनी महाराष्ट्र 'पक्षी मित्र' संघटनेचा एकूण कारभार कसा चालतो हे सर्वांना सांगितले. श्री अविनाशजी कुबल यांनी त्यांच्या प्रदीर्घ अनुभवातून सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

त्यानंतर दृकश्राव्य माध्यमाद्वारे वेगवेगळ्या विषयांवर सादरीकरण झाले. सी.ए. मधुकर जगताप यांनी 'एनजीओ'करिता सीआरएस फंड कसा उपयोगी पडू शकतो याबद्दल माहिती दिली. श्री. सतीश गोगटे यांनी महाराष्ट्राचे पहिले रामसर– नांदूर मध्यमेश्वर आणि जागतिक तापमानवाढ या विषयी उद्बोधक रीतीने उहापोह केला. सौ. संजना काजवे यांनी माझे परसदारातील पक्षी निरीक्षण या विषयावर बोलून पक्षी निरीक्षण आपण कुठेही करू शकतो, त्यासाठी नेहमी जंगलातच जायला पाहिजे असे नाही असे पटवून दिले. डॉ. अनिल माळी यांनी नाशिक जिल्ह्यातील गिधाडांचे अस्तित्व या विषयावर अभ्यासपूर्ण माहिती सादर करून गिधाडांचे पर्यावरणातील महत्त्व आणि गिधाडांची सद्यस्थिती कशी सुधारते आहे याकडे सर्वांचे लक्ष्य वेधले. डॉ. संजय गायकवाड यांनी त्यांचे जखमी पक्ष्यांवरील उपचारांबाबतीतले अनुभव अतिशय रंजक पद्धतीने सादर केले. श्री अनिल कुबल यांनी त्यांना महाराष्ट्र स्तरावर या विषयावर शिबिर घेण्याची विनंती केली आहे. डॉ. प्रशांत वाघ यांनी घुबड हा कसा रहस्यमय पक्षी आहे आणि तो शेतकऱ्यांचा मित्र कसा आहे या विषयावर सखोल माहिती दिली. मिलिंद देशमुख यांनी Bird Photography- Tips n Tricks" याबद्दल उपयुक्त माहिती पुरवून पक्षी निरीक्षण करताना फोटोग्राफीचे काय महत्व असते ते सांगितले.

सादरीकरणकर्त्यांची आणि वक्त्यांची ओळख डॉ. अनिल माळी, सौ. नीता लेले, श्री. रवींद्र वामनाचार्य, डॉ. अरुणा पाटील, सीमा तंगडपल्लीवार आणि मिलिंद सावळे यांनी करून दिली.

सर्व उपस्थितांच्या ओळखीनंतर श्री. अविनाशजी कुबल यांनी एकूण कार्यक्रमाचा आढावा घेऊन पुढील कार्यक्रमांची रूपरेषा सुचविली. सूत्रसंचलन सौ. स्मिता भामरे यांनी केले. श्री. रवींद्र वामनाचार्य यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. या मेळाव्याच्या निमित्ताने १२ नवे सभासद झाले. जिल्ह्यात एकूण ८० सभासद आहेत. १० सभासदांनी तरी हजर राहता येणार नाही, असे कळविले होते. एकंदर ३७ सभासद हजर होते.

*****

## ३६ वे पक्षी मित्र संमेलन

सांगली येथे २३ व २४ डिसेंबर २०२३ रोजी होणार आहे. त्याला जोडून २२ डिसेंबर रोजी 'पक्ष्यांचे आवाज' या विषयावरील पहिली राष्ट्रीय स्तरावरील परिषद होणार आहे.

# टपाल तिकिटांच्या दुनियेत
# मलबारी कवड्या धनेश
## Malabar Pied Hornbill (Anthracoceros coronatus)

भारतामध्ये धनेश पक्ष्याच्या आठ प्रजाती आढळून येतात. सर्व प्रकारच्या धनेश पक्ष्यांच्या सवयी जवळ जवळ सारख्याच असतात. त्यापैकी मलबारी कवडया धनेश ही प्रजाती कोकण व पश्चिम घाटात तसेच श्रीलंकेच्या उष्णकटीबंधीय शुष्कपर्णी जंगलात आढळते. हा धनेश मोठा असतो. हा चोचीपासून शेपटापर्यंत तीन फूट लांब असतो. त्याचे पंख मान व डोके काळे असते. छाती काळी असते, पोटाचा भाग पांढरा असतो. शेपटी वरील पिसे काळी पांढरी असतात व टोकाची पिसे पांढरी असतात. गालावर लाल टिळा असतो. त्याची चोच जाड व लांब व पिवळी जर्द असते. चोचीवर मोठे पिवळे शिंग असते व त्याचे पुढील व मागील टोक काळे असते. धनेशाचे डोके लालभडक असते. मादीच्या रंगात थोडा फरक असतो, तिच्या डोळ्या भोवतालचा भाग पांढरा असतो.

हा पक्षी जंगलात वास्तव्य करतो व मुख्यत्वे ज्या जंगलात वड, पिंपळ इत्यादी वृक्ष असतात ती जंगले हे पक्षी अधिक पसंत करतात. वड व इतर वृक्षांची फळे धनेश पक्षी जास्त प्रमाणात खातो. कधी कधी सरडे, छोटे उंदीर, घुशी व छोटे पक्षी पण खातो. याचा विणीचा हंगाम मार्च ते जून पर्यंत असतो. झाडाच्या ढोलीत मादी २-४ पांढरी अंडी घालते. नंतर घरटे लिंपून टाकते. त्याला एक छिद्र ठेवते. नर त्या छिद्रातून पिलांना भरवतो. पिले अंडयातून बाहेर आल्यानंतर मादी बाहेर येते.

अशा या सुंदर पक्ष्यावर श्रीलंका टपाल विभागातर्फे २००३ साली श्रीलंकेत आढळणाऱ्या पक्ष्यांचा तिकिटांचा संच प्रकाशित केला, त्यामध्ये ४.५० रूपये किमतीचे आकर्षक टपाल तिकीट प्रकाशित केले आहे. तसेच ११ फेब्रुवारी २०२३ रोजी कर्नाटक टपाल विभागातर्फे मलबारी कवडया धनेश पक्ष्यावर विशेष आवरण प्रकाशित केले, त्यावर या पक्ष्याचे आकर्षक चित्र व तिकिटावर धनेशाची मुद्रा असलेला शिक्का मारलेला दिसत आहे.

**रवींद्र वामनाचार्य**
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in








Birds & Mammals **Sculpture**

Bird Calls **CDS**

Singing Bird **Clock**

# Wildlifekart.com

## Online Shop for Nature and Wildlife Lovers

wildlifekart@gmail.com    7400488996

- 1,000 + Birds and Wildlife related products
- 100 + Products categories
- Information of various Wildlife Resorts across India, Wildlife Tours and Wildlife News






Birds & Wiildlife **Tshirts**

Birds and Mammals **Lapel Pins**

Beautiful **Bird Nests**

घरकुल
मसाले

# महाराष्ट्राचे आपले,
# घरकुल मसाले...




**GHARRKUL INDUSTRIES PVT. LTD.**

**Dealer Enquiry Solicited : 9965 961 961** | gharkul.masala@gmail.com | Follow us :

## पहिल्या क्रमांकावर चिमणी

इंग्लंडमधील नागरिकांनी आठ दिवसांपर्यंत अर्धा तास आपल्या आवारात येणाऱ्या पक्ष्यांची नोंद जानेवारी महिन्यात करावी, असे आवाहन करण्यात आले होते. ५४०००० नागरिकांनी घेतलेल्या नोंदीचे संकलन करण्यात आले तेव्हा घर चिमणी पहिल्या क्रमांकाने नोंदली गेली. गेली २० वर्षे ती पहिल्या क्रमांकावर आहे. १९६० साली ती दिसेनाशी झाली होती. आता ती विक्रम करते आहे.गेली तीन वर्षे निळा हिट पक्षी दुसऱ्या क्रमांकावर आहे. तिसऱ्या क्रमांकावर आढळणारी मैना; पर गेल्या वर्षीपेक्षा तिची संख्या घटलेली आहे. एवढ्याशा इंग्लंडमध्ये ५ लाखाहून अधिक नागरिकांनी सर्वेक्षणात भाग घेतला, हे विशेष आहे.

****

## विदर्भातील सारस क्रौंच

सारस क्रांच पक्ष्याच्या संवर्धनासाठी मध्य प्रदेश सरकारने गांभीर्याने उपाययोजना केल्यामुळे बालाघाट जिल्ह्यात त्यांची संख्या ५० वर गेली आहे. तिथून हे पक्षी गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यामध्ये येत असल्याने महाराष्ट्रातील त्यांची संख्या वाढल्याचा अंदाज आहे.
(महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र)

****

## माळढोक पक्ष्याचे चंद्रपुरात दर्शन

चंद्रपूर जिल्ह्यात माळढोक पक्षी दिसून आल्यामुळे त्याचे अस्तित्व राज्यात शिल्लक असल्याची खात्री झाली आहे.
(महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र)

## माहितीचा उजाळा उत्तरे

१. पांढऱ्या छातीचा धीवर
२. हॅमशीयर ऑरनिथॉलॉजीकल सोसायटी, हॅमशीयर.
३. कोकाबुरा
४. किंगफिशर
५. लेसी नोवल्स
६. बारा
७. कवड्या धीवर
८. पांढऱ्या छातीचा धीवर
९. आफ्रिकेत
१०. अतुल धामणकर

****

**पक्षिमित्र अंकासाठी आपले पक्षिविषयक लेख, साहित्य संपादक श्री. दिगंबर गाडगीळ dgadgil09@gmail.com आणि सहाय्यक संपादक श्री. किरण मोरे kiranmorey1983@gmail.com यांच्या दोन्ही ईमेलवर पाठवावेत**

Book Post

प्रती,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षिमित्र
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org
Mob.+91 7030101981

पक्षिमित्र
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : गौरी एंटरप्राइजेस, नाशिक
मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन